माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२६५६**

**अपिलार्थी श्रीमती सुजाता सचिन काटकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी (मुंबई-४)**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
सिने प्लॅनेट सिनेमा समोर, शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०५.२०२४ | १४.०५.२०२४/२४.०७.२०२४ | ०४.०६.२०२४ | ०४.०७.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०८.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २४.०७.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०४.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *“Dev Infra आणि Prism Jonson या RMC Plants उद्योगांची सन 2000 ते 2024 कालखंडानुसार माहिती मिळण्याबाबत. मुद्दा क्र. (१) महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या राजपत्रानूसार व मंडळाने काढलेल्या परिपत्रकानुसार या दोन्ही RMC Plants ला संमती पत्रे दिले असल्यास त्याची माहिती द्या. मुद्दा क्र. (२) या दोन्ही उद्योग (RMC Plants) चालकांनी भुखंड मालकांची व संबंधित विभागांची परवानगी / संमतीपत्रे प्राप्त केले असल्यास त्याची माहिती द्यावी. मुद्दा क्र. (३) या दोन्ही उद्योगांना परवानगी संमती पत्र देण्याआधी Site visit च्या आहवालाची माहिती द्या. मुद्दा क्र. (४) या दोन्ही उद्योगांशी निगडीत कागदपत्रांची फाईल अर्जदारास निरीक्षणास (अवलोकनास) बोलावून निरीक्षणांती अर्जदारास आवश्यक असलेली कागदपत्रे द्यावीत.”*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०४.०६.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०७.२०२४ रोजी असे आदेशित केले की, *"Dev Infra आणि Prism Johson RMC Plant या आर. एम. सी उद्योगांच्या संमतीपत्रांच्या प्रती, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर शासकीय विभागांचे परवाने / ना- हरकत दाखले (नस्तीमध्ये उपलब्ध असल्यास) अर्जदारास आदेश पारित झालेल्या दिवसापासुन १५ दिवसांच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सबब, अर्जदाराने दाखल केलेला अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे."*

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी दि. १४.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिली होती व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार दि.११.०७.२०२४ रोजी २३ पानांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.०५.२०२४ व दि. ११.०७.२०२४ रोजीच्या पत्रांची प्रत आयोगासमोर सादर केली.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

15-12-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १५.१२.२०२५**